**सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन** | **संकलित मूल्यमापन सत्र -१**

नमुना प्रश्नपत्रिका

# इयत्ता – पाचवी विषय – मराठी

विद्यार्थ्याचे नाव : ------------------------------------------------ हजेरी क्र :

शाळेचे नाव : ------------------------------------------------ तुकडी : ----------------

केंद्र : ---------------- ता : ---------------- जि : ---------------- दिनांक : / / २०२०

| प्रश्न क्रमांक | लेखी | | | | | | | तोंडी | | एकूण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | |
| प्राप्त गुण | | | | | | | | | | | |
| कमाल गुण | ५ | ५ | ५ | ५ | १० | ५ | ५ | ५ | ५ | ५० | |

**प्र. १. शब्द ऐकून लिही .** (गुण ५)

१) ---------------- २) ---------------- ३) ---------------- ४) ----------------

५) ---------------- ६) ---------------- ७) ---------------- ८) ----------------

९) ---------------- १०) ----------------

**प्रश्न २. हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

कृष्णा काठी वसलेले राजापूर हे एक गाव. साखर कारखान्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात ऊस पिकवला जातो. ऊसाची वाहतूक बैलगाडीतून केली जाते. कारखान्यापर्यंत कच्चे - पक्के रस्ते आहेत. एकामागून एक ऊसाच्या गाड्या कारखान्याकडे जातात.

१) वरील उताऱ्यात कोणत्या नदीचा उल्लेख आलेला आहे ? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) कोयना ब) कृष्णा क) तापी

२) राजापूर गावात ऊसाचे पीक जास्त प्रमाणात का घेतले जात असावे? (गुण २)

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

३) ‘ गाड्या ’ या शब्दाचा एकवचनी शब्द ओळख. योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) गाडीवान ब) गाडे क) गाडी ड) मोटार

४) तुमच्या परिसरात घेत असलेल्या दोन पिकांची नावे लिही. (गुण १)

------------------------------------------------------------

**प्र. ३. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.** (गुण ३)

१) कविता कोणत्या धावपटूला आदर्श मानते?

------------------------------------------------------------

२) वाघांची गणती कशावरून केली जाते?

------------------------------------------------------------

३) पाऊलवाटेवरून कोण येते?

------------------------------------------------------------

**प्र. ३. ब) खालील शब्दांना पर्यायी मराठी शब्द लिही.** (गुण २)

१) मोबाईल : -------------------------- २) बाईक : ------------------------------

**प्र. ४. खालील बातम्यांची कात्रणे वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

पुणे जिल्ह्यातील डोंगरामध्ये वसलेले माळीण गाव. ३० जुलै २०१४ या दिवशी प्रचंड पावसामुळे दरड कोसळून हे गाव गाडले गेले. मनुष्यहानी झाली. या बातमीने महाराष्ट्रच नव्हे, तर सगळा देश हळहळला. या घटनेसंदर्भातील वर्तमानपत्रांतील बातम्यांच्या शीर्षकांची ही कात्रणे.




१) माळीण गावात साधारणतः किती कुटुंबे राहत होती? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

१) ४० २) ५० ३) ४० ते ५० च्या दरम्यान ४) यापैकी नाही

२) माळीण गावाबाबतची दुर्घटना कोणत्या ऋतूत व कोणत्या दिवशी घडली? (गुण २)

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

३) माळीण गावाबाबतची दुर्घटना कशामुळे घडली? (गुण २)

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**प्र. ५. खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव.**

अ) समान अर्थाचे शब्द लिही. (गुण ३)

१) क्रीडा : ---------------- २) माय : ---------------- ३) कणखर : ----------------

ब) अधोरेखित नामा ऐवजी योग्य सर्वनाम वापर व लिही. (गुण २)

१) राणी अभ्यास करते. : ------------------------------

२) समीरने सुंदर चित्र काढले. : ------------------------------

क) खालील वाक्यातील नामे ओळख व कोणत्याही दोन नामांना गोल कर. (गुण ३)

१) आज कविता भारतातील अव्वल धावपटू आहे. २) समीरची गाडी रस्त्यावरच बंद पडली.

३) उद्या रमेश काका मुंबईहून येणार आहेत.

ड) खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग कर व लिही. (गुण २)

१) माग काढणे : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

२) पलटी होणे : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**प्र. ६. खालील कविता वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे ओळख व लिही.**

तापीकाठची चिकण माती,
ओटा तरी बांधू ग बाई.

असा ओटा चांगला तर,
जातं तरी मांडू ग बाई.

असं जातं चांगलं तर,
सोजी तरी दळू ग बाई.

अशी सोजी चांगली तर,
लाडू तरी बांधू ग बाई.

असे लाडू चांगले तर,
शेल्याच्या पदरी बांधू ग बाई.

१) कवितेत मातीचा कोणता प्रकार सांगितलेला आहे? (गुण १)

------------------------------------------------------------

**२) काय ते लिही.** (गुण २)

अ) लाडू बनवण्यासाठी उपयुक्त पीठ : ----------------------------------------

ब) कवितेत वर्णन केलेली नदी : ----------------------------------------

३) कवितेतील स्त्री लाडू कशाचे व कोठे बांधणार आहे? (गुण २)

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**प्र. ७.** खाली दिलेल्या शब्दांच्या आधारे एक गोष्ट तयार करून लिही. (गुण ५)

( पाऊस , गाव , होडी , महापूर )

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

# तोंडी प्रश्नपत्रिका

५ वी – मराठी

**तोंडी प्रश्नाबाबत शिक्षकांसाठी सुचना ( एकूण गुण : १० )**

**तोंडी प्रश्न ८) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे .** **(गुण ५)**

**प्रश्नकर्त्याने देण्याची सुचना** – मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच . मग मी काही प्रश्न विचारणार आहे. त्यांची उत्तरे तू सांग.

**उतारा :**

**"वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी", झाडे ही आपले खरे मित्र आहेत. झाडांचे उपयोग सांगावे तेवढे कमीच आहे. झाडे हवेचे प्रदूषण रोखण्यास मदत करते. सजीवांना ऑक्सिजन पुरवते. झाडांपासून मधुर फळे, रंगीत मनमोहक फुले, लाकूड मिळते. झाडांपासून सावली तसेच पक्षांना व जनावरांना असार मिळतो. उन्हापासून संरक्षण होते. झाडापासून अनेक औषधी बनवल्या जातात. झाडे मुळापासून ते पानापर्यंत सर्वकाही मानवाला अर्पण करते ते पण निस्वार्थीपणे. झाडांचे अनेक फायदे आहेत म्हणूनच प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे व त्याची काळजी घेऊन जगावावे. "झाडे लावा प्रदूषण टाळा."**

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** **(गुण ५)**

**तोंडी प्रश्न ९) १) हवेचे प्रदूषण रोखण्यास कोण मदत करते?** **(१)**

अ) माती   ब) झाडे   क) औषध   ड) माणसे

**२) तू झाडांचे संगोपन कसे करतोस / करतेस ?** **(२)**

संगोपनाबाबत कोणतेही उत्तर स्विकारणे.

**३) झाडांचे कोणकोणते फायदे आहेत ?** **(२)**

झाडांपासून मधुर फळे, रंगीत मनमोहक फुले, लाकूड,सावली मिळते.काही झाडे औषधी असतात. आपल्याला ऑक्सिजन देखील मिळतो.

## लेखी प्रश्नाबाबत शिक्षकांसाठी सुचना

**प्र. १) शब्द ऐकून लिही . ( मुलांना खालील शब्द सांगावे )**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) कणखर | २) नावाडी | ३) पिशवी | ४) मैदानी | ५) विक्रम |
| ६) राऊत | ७) एक्स्प्रेस | ८) पृथ्वी | ९) चर्चा | १०) दांपत्य |

Subscribe

नवीन शैक्षणिक व्हिडिओंसाठी आमचे खालील युट्युब चॅनल्स सबस्क्राईब करा.

प्रविण डाकरे : www.youtube.com/c/TechAidGuruji

जयदिप डाकरे : www.youtube.com/c/Gurumaulee

